भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १९८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १९/०३/२०१७

१) घराचा समोरील दाराचा कोंडा तोडुन आत प्रवेश करुन सोन्याचे साहित्य व नगदी पैश्याची चोरी . :–

दिनांक १७/०३/२०१७ चे १९.३० ते २०.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी प्रवीण शंकर वावरे वय ३० वर्ष, रा. आंबाडी हा आपल्या कुंटुबासह औषधोपचार कामी भंडारा येथे दवाखाण्यात गेले असतांना कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण फिर्यादीचे घराचे समोरील दाराचा कोंडा तोडुन आत प्रवेश करुन बेडरुम मधील गोदरेज आलमारीचा लॉक तोडुन १ सोन्याचा मंगळसुत्र, २ सोन्याच्या अंगठया प्रत्येकी ३ ग्रॅम, २ सोन्याच्या गोप प्रत्येकी ५ ग्रॅम, सोन्याचे कानातील टॉप्स ३ ग्रॅम, सोन्याचे लॉकेट ४ नग ४ ग्रॅम, सोन्याचे क्वाईन/ सिक्के १० ग्रॅम, असा एकुण ५८ ग्रॅम सोना व नगदी ७५००/–रु. असा एकुण १,४२,५००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. इंगोले पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

२) प्राणी निर्दयतेने वाहतुक करत असतांना ट्रक अडवुन कायदेशीर कार्यवाही करण्याकरीता पोस्टेला आणत असतांना त्यांना जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद.:–

दिनांक १८/०३/२०१७ चे ०९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी हे वाहतुक केसेस करण्यासाठी पेट्रोलींग करीत असतांनी कारधा टोलनाका येथे ट्रक क्र. एमएच ४०/३१७४ ला थांबवुन चेक केले असता ट्रक मध्ये १० ते १२ जनावरे डांबुन कोंबुन निर्दयतेने वाहतुक करतांनी मिळुन आला तेव्हा फिर्यादी हा ट्रक मध्ये बसुन कायदेशीर कारवाही करण्या करीता ट्रक पो.स्टे. कारधा येथे घेवुन येत असतांनी ट्रक चालकाने ट्रक पो.स्टे. कडे न वळवता नागपुरचे दिशेने फिर्यादीस घेवुन भरधाव वेगाने घेवुन निघुन गेला व फिर्यादीस जिवे मारण्याचा प्रयत्न केला शहापुर गावा जवळ फिर्यादीस चालत्या ट्रक मधुन खाली पाडले त्यामुळे फिर्यादीचे डावे फसली जवळ व घुडग्याला मार लागुन दुखत असल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. मेश्राम वानिशा भंडारा यांचे लेखी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३०७,३६६,३५३,१८३,३४ भादवि. सहकलम ११(ड)(ई)प्र.नि.वा.कायदा. सहकलम ९ अ महा. प्रा. सं. कायदा सहकलम १८४,६६/१९२,११९/१७७ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. इंगोले पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहे.

३) जुन्या वादावरुन भांडण करुन लोखंडी त्रिशुलने मारुन जखमी केले . :–

दिनांक १८/०३/२०१७ चे १६.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी मनिष वसंता राऊत वय ४२ वर्ष, रा. अडयाळ हा आपले मित्रा सोबत अडयाळ वरुन मोटार सायकलने दवाखाण्यात जात असतांनी यातील आरोपीने त्यांना आवाज देवुन थांबवुन घरी नेऊन बसविले व जुण्या कोंबडयाचे चोरीचे कारणा वरुन भांडण करुन आरोपीने आपल्या घरातील पुजेचा लहान लोखंडी त्रिशुलने फिर्यादीचे डावे कुशीचे खाली व डावे हाताचे आंगठी व आंगठयाचे मध्ये मारुन जखमी केल्याने फिर्यादीचे बयान व डॉ. परिक्षण रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३२४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

४) संगनमत करुन काळी गिट्टी चोरुन नेल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १५/०३/२०१७ चे ०२.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी मनिष हर्षप्रकाश मेश्राम वय ३९ वर्ष, रा. सेंदुरवाफा हे डांबर प्लॉट चारगाव फाटा येथे मॅनेजर असुन यातील आरोपी क्र. १ हा सुपरवायझर म्हणुन काम पाहत असुन यातील दोन्ही आरोपीतांनी संगनमत करुन ट्रक मध्ये ७०० फुट २० एमएम ची काळी गिट्टी किमंती २३,०००/–रु. चा माल चोरुन घेवुन गेल्याचे दिंनाक ११/०३/२०१७ ला फिर्यादीचे लक्षात आल्या नंतर फिर्यादीने गिट्टी चोरी संबंधात पुर्ण चौकशी करुन आज रोजी पो.स्टे. ला येवुन तोंडी रिपोर्ट दिल्याने पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भजने पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**५) अज्ञात मोटार सायकल चालकाने पायी जाणाऱ्या मुलास धडक देवुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १७/०३/२०१७ चे १६.१५ वा. दरम्यान यातील जखमी फिर्यादी आदित्य धनराज भालेराव वय १४ वर्ष, ~~रा.~~ रा. आदर्श नगर लाखनी हा ट्युशन वरुन आपले घराकडे पायी येत असतांनी भंडारा कडुन लाखनी कडे येणाऱ्या यातील अज्ञात मोटार सायकल चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल सार्वजनिक रोडवर बेदकारपने, धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीस ॲप्ल बार जवळील चोले यांचे घरा समोर एनएच ०६ रोड मुरमाडी येथे धडक मारुन त्याचे उजवे पायाचे पोटरीला व डावे डोळयाजवळ जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १८४,१३४ ब मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. उईके पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**६) चारचाकी वाहन चालकांने झाडाला धडक देवुन स्वत: व गाडीतील लोकांना जखमी केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक १६/०३/२०१७ चे २२.३० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने, भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन बाभरीचे झाडाला धडक देवुन स्वत: व गाडीत बसलेल्या लोकांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने अभिमण्यु तोलीराम भांडारकर वय ५४ वर्ष, रा. घोगरा ता. तिरोडा जि. गोदिंया यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. कटरे पो.स्टे. करडी हे करीत आहेत.

**७) संगनमत करुन भांडण व शिवीगाळ केली व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १३/०३/२०१७ रोजी १०.०० वा. दर. यातील फिर्यादी अनिल गिरीधारी चंदनबटवे वय ३७ वर्ष, रा. नेहरु वार्ड मेंढा भंडारा व आरोपी हे नातेवाईक असुन आरोपी क्र. १ सोबत जुने वाद असल्याने यातील आरोपी क्र. २ ने फिर्यादीचे घरी जेवन केले असता आरोपी क्र. १ ने तु त्याचे घरी जेवन का केला त्याचे सोबत आमचे पटत नाही असे बोलुन आरोपी क्र. १ ते ३ यांनी संगनमत करुन जुने भांडणा वरुन शिवीगाळ केले व आरोपी क्र. १ ने काठीने फिर्यादीचे दोन्ही हातावर व पाठीवर मारुन जखमी करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,५०४,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. रायपुरे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**८) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :—**

दिनांक १८/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. कारधा, भंडारा, व लाखनी येथे अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ०७ लिटर हातभटटी किंमती ४९०/—रु. तसेच जुगारातुन किंमती १,५८,९६०/—रू. असा एकुण किंमती १,५९,४५०/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.